सोलापूर जिल्ह्यातील यांत्रिकी कामांकरिता विभाग व उपविभागीय कार्यालये उपलब्ध करणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : आढावा-२०१७/प्र.क्र.२४९/२०१७/आ(प्रशि),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०६ डिसेंबर, २०१७

वाचा:
1) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, टिआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दिनांक ८/३/१९८४.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : १०९२/सीआर/८०६/व्यय-६, दि.१५/१०/१९९२.
3) शासन निर्णय जलसंपदा विभाग, क्रमांक: आढावा-१००२/३३५/२००२/आ.(प्रशि), दि.०६/०२/२००३.

प्रस्तावना :

अधीक्षक अभियंता भिमा कालवा मंडळ, सोलापूर अंतर्गत एकरुख टप्पा १ व २, शिरापूर टप्पा १ व २, बार्शी टप्पा १ व २, आष्टी टप्पा १ व २ तसेच, दहीगाव टप्पा १ व २, मंगळवेढा टप्पा १ व २ या उपसा सिंचन योजना कार्यान्वित होत आहेत. सदर उपसा सिंचनांचे परिचलन कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.१, दापोडी, पुणे अंतर्गतच्या उपविभागांकडे सोपविण्यात आले असल्याने सदर योजनांचे परिचलनावर पुणे मुख्यालय (दापोडी, पुणे) येथून कामाचे नियंत्रण करणे गैरसोयीचे आहे. तसेच, यांत्रिकी संघटनेतील उपविभागांचा आढावा व कामांचा वेध घेऊन मंडळांतर्गत असलेल्या कार्यक्षमतेपेक्षा कमी काम असलेल्या उपविभागांच्या कार्यप्रणालीमध्ये बदल करणे व उपलब्ध कामाप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. सर्व उपसा सिंचन योजनांची कामे सुरळीतपणे, प्राधान्याने व स्थापत्य विभागाच्या समन्वयाने लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.१, दापोडी, पुणे हे विभागीय कार्यालय अंतर्गतच्या ३ उपविभागीय कार्यालयांसह सोलापूर जिल्ह्यातील यांत्रिकी कामांच्या दृष्टीने भौगोलिक व तांत्रिक नियंत्रणासाठी योग्य असल्याने, सोलापूर मुख्यालयी तसेच, मंडळांतर्गतच्या उपविभागीय कार्यालयांच्या विभागीय संनियंत्रणात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे अधिनस्त कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.१, दापोडी, पुणे हे विभागीय कार्यालय अंतर्गतच्या (१) उपसा सिंचन यांत्रिकी

उपविभाग क्र.१, दापोडी, पुणे, (२) वाहतुक उपविभाग, दापोडी, पुणे व (३) हत्यारे व परिरक्षण उपविभाग, दापोडी, पुणे या तीन उपविभागीय कार्यालयांसह सोलापूर मुख्यालयी स्थलांतरीत करण्यास तसेच मंडळांतर्गतच्या (१) उपसा सिंचन व विंधन यांत्रिकी उपविभाग क्र.२, दापोडी, पुणे व (२) यांत्रिकी उपविभाग, पंढरपूर या दोन उपविभागीय कार्यालयांच्या विभागीय संनियंत्रणात बदल करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

- उपरोक्त नमूद विभागीय व उपविभागीय कार्यालये शासकीय जागेतच ठेवावीत, त्यासाठी बांधकामाचा वेगळ्याने खर्च करु नये.
- सध्याच्या कार्यरत कार्यालयातील उपलब्ध साहित्याचाच वापर करण्यात यावा. प्रशासकीय व आस्थापना खर्चात वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.
- स्थलांतरीत होणाऱ्या विभागीय व उपविभागीय कार्यालयातील गट "अ" व गट "ब" मधील अधिकाऱ्यांची सेवा सोलापूर व टेंभूर्णी मुख्यालयी कार्यरत राहील. तसेच, गट "क" व "ड" मधील कर्मचाऱ्यांचे समावेशन व सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही स्थानिक परिमंडळ कार्यालयामार्फत करण्यात यावी.
- अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे अधिनस्त उपरोक्त प्रमाणे होणाऱ्या बदलान्वये विभागीय व उपविभागीय कार्यालयांची रचना "**प्रपत्र-अ**" नुसार राहील. यान्वये विभागीय व उपविभागीय कार्यालयांच्या रचनेत होणारे बदल वगळता इतर विभागीय व उपविभागीय कार्यालये पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहतील.
- कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.१, दापोडी, पुणे या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गतच्या ३ उपविभागीय कार्यालयांसह सोलापूर येथे होणाऱ्या स्थलांतरणानंतर सदर जागेचा उपयोग कर्मशाळेच्या प्रचलनासाठी तसेच, द्वार निर्मिती, उच्चालक निर्मिती व जोडणी, संयंत्र निगा व देखभाल दुरुस्ती करण्यासाठी, यंत्रशाळा प्रचलन, विंधन कामे इत्यादी कामांसाठी करण्यात यावा.
- स्थलांतरीत होणाऱ्या विभाग व उपविभागांतर्गत सोलापूर कजिल्हा व लगतच्या भागातील उपसा सिंचन योजनांची कामे, माती कामे, धरण द्वारे कामे व इतर अनुषंगिक यांत्रिकी कामे करण्यात यावी.

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक ईआरडब्ल्यू -१०८३/ सीआर-६११/ ८३/ एडीएम-९, दिनांक ८ मार्च १९८४ मधील तरतूदीनुसार, संबंधित विभागाचे "कार्यकारी अभियंता" यांना आहरण व संवितरण अधिकारी व "अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे" हे या कार्यालयांचे नियंत्रण अधिकारी म्हणून यान्वये घोषित करण्यात येत आहे.

४. विभाग व उपविभागीय कार्यालयांच्या मुख्यालय बदलानुसार सदर कार्यालये दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून सोलापूर येथे शासकीय जागेत कार्यान्वित होईल याद्दष्टीने अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे व मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांनी आवश्यक ती सर्व कार्यवाही तात्काळ करावी.

५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. १०९२/सीआर-८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२ मधील तरतूदींनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व आंतर वित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने हा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१२०६१७२६१९८३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Vijay K. Chaudhari

Digitally signed by Vijay K. Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, cn=Vijay K. Chaudhari
Date: 2017.12.06 17:29:41 +05'30'

(वि. का. चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४) मा.मंत्री (खारजमीन) यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा.
७) मा. विधान परिषद / विधानसभा सदस्य (सर्व).
८) प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१२) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर.
१३) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे / सर्व महासंचालक.
१५) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
१७) मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक.
१८) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे.
१९) आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) अधीक्षक अभियंता, ई-प्रशासन मंडळ, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई (कार्यालयांच्या बदलाची आवश्यक ती नोंद घेण्यास्तव)
२१) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.१, दापोडी, पुणे.
२२) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.२, स्वारगेट, पुणे.
२३) उप अभियंता, उपसा सिंचन यांत्रिकी उपविभाग क्र.१, दापोडी, पुणे.

२४) उप अभियंता, वाहतूक उपविभाग, दापोडी, पुणे.
२५) उप अभियंता, हत्यारे व परिरक्षण उपविभाग, दापोडी, पुणे.
२६) उप अभियंता, उपसा सिंचन व विंधन यांत्रिकी उपविभाग क्र.२, दापोडी, पुणे.
२७) उप अभियंता, यांत्रिकी उपविभाग, पंढरपूर.
२८) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) आस्थापना (प्रशिक्षण) संग्रहार्थ.

(शासन निर्णय क्रमांक : आढावा-२०१७/प्र.क्र.२४९/२०१७/आ.(प्रशि), दिनांक- ०६ डिसेंबर, २०१७ सोबतचे **प्रपत्र-अ**)

अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे अंतर्गतच्या कार्यालयांच्या स्थलांतरणानंतर विभाग/उपविभाग कार्यालयांची सुधारित रचना

अ.क्र.	सध्याचे कार्यालयाचे नांव	बदलानंतरचे कार्यालयाचे नांव	कार्यालयांतर्गत झालेला बदल
(१)	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.१, दापोडी, पुणे**	**(१) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर**	विभागीय कार्यालयाच्या नावात, मुख्यालयात तसेच अंतर्गतच्या उपविभागीय कार्यालयांच्या संनियंत्रणात व त्यांच्या नावात आणि मुख्यालयात बदल.
(i)	**उपसा सिंचन यांत्रिकी उपविभाग क्र.१, दापोडी, पुणे**	**(i) यांत्रिकी उपविभाग, सोलापूर**	सदर उपविभागीय कार्यालयांच्या नावात व मुख्यालयात बदल
(ii)	**वाहतूक उपविभाग, दापोडी, पुणे**	**(ii) यांत्रिकी उपविभाग, टेंभूर्णी, जि.सोलापूर**	
(iii)	**हत्यारे व परिरक्षण उपविभाग, दापोडी, पुणे**	**(iii) यांत्रिकी व विद्युत उपविभाग, सोलापूर**	
(iv)	उपसा सिंचन व विंधन यांत्रिकी उपविभाग क्र.२, दापोडी, पुणे	----	सदर उपविभागीय कार्यालय याच मंडळांतर्गतच्या यांत्रिकी विभाग क्र.२, स्वारगेट, पुणे या विभागीय कार्यालयाच्या संनियंत्रणाखाली वर्ग. (विभागीय नियंत्रण व नावात बदल)
	----	(iv) यांत्रिकी उपविभाग, पंढरपूर	या मंडळांतर्गतच्या यांत्रिकी विभाग क्र.२, स्वारगेट, पुणे अंतर्गतचे यांत्रिकी उपविभाग, पंढरपूर हे उपविभागीय कार्यालय यांत्रिकी विभाग, सोलापूर या विभागीय कार्यालयाच्या संनियंत्रणाखाली संलग्न. (विभागीय नियंत्रणात बदल)
(२)	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.२, स्वारगेट, पुणे	(२) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र.२, स्वारगेट, पुणे	विभागीय कार्यालयांतर्गतच्या उपविभागीय कार्यालयांच्या संनियंत्रणात बदल
(i)	यांत्रिकी उपविभाग, स्वारगेट, पुणे	(i) यांत्रिकी उपविभाग, स्वारगेट, पुणे	उपविभागीय कार्यालयांतर्गत कोणताही बदल नाही
(ii)	यांत्रिकी उपविभाग, पाटस	(ii) यांत्रिकी उपविभाग, पाटस	
(iii)	यांत्रिकी उपविभाग, नारायणगाव	(iii) यांत्रिकी उपविभाग, नारायणगाव	
(iv)	यांत्रिकी उपविभाग, पंढरपूर	----	सदर उपविभागीय कार्यालय यांत्रिकी विभाग, सोलापूर या विभागीय कार्यालयाच्या संनियंत्रणाखाली संलग्न. (विभागीय नियंत्रणात बदल)
	----	(iv) विंधन व वाहतूक उपविभाग, दापोडी, पुणे	या मंडळांतर्गतच्या यांत्रिकी विभाग, अंतर्गतचे उपसा सिंचन व विंधन यांत्रिकी उपविभाग क्र.२, दापोडी, पुणे हे उपविभागीय कार्यालय या विभागीय कार्यालयाच्या संनियंत्रणाखाली संलग्न. (विभागीय नियंत्रण व नावात बदल)

Vijay K. Chaudhari

Digitally signed by Vijay K. Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, cn=Vijay K. Chaudhari
Date: 2017.12.06 17:30:42 +05'30'

(वि. का. चौधरी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन